MHAH230007972016

विशेष दिवाणी दावा क्र. ३५/२०१६ मधील नि.३४ वरील आदेश
(रूपाली दिवटे वि.एस.दत्ता मिनरल प्रा.लि.कंपनी)

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ नुसार वादपत्रात दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार, दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे खरेदीखत बेकायदेशीर ठरवून मिळण्यासाठी प्रस्तुत दावा दाखल करण्यात आला आहे. नमुद दावा मिळकत मॅनेजर पंजाब नॅशनल बँक यांच्या लाभात मॉर्गेज डिड करून दिलेले आहे व सध्या सदरील पंजाब नॅशनल बँक शाखा लक्ष्मीरोड, पुणे व प्रतिवादी क्र. १ व २ हे एकमिलाफी झालेले आहेत. त्या कारणास्तव न्यायाचे दृष्टीने पंजाब नॅशनल बँक, पुणे यांना दाव्यात प्रतिवादीपणात समाविष्ट करणे गरजेचे आहे. सदर दुरुस्ती झाल्यास न्यायाचे दृष्टीने मदत होणार आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज खरा, बरोबर व कायदेशीर नाही. दावा जाहिर ठरावासाठी असल्याने प्रतिवादी क्र. ४ यांना दाव्यामध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता नाही. मॉर्गेज डिड दाखल केले नाही.अर्ज उशिरा दाखल केला असल्याने नामंजुर करावा.

३. वादी व प्रतिवादी यांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

४. अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेह पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात विनंती केल्यानुसार वादपत्रात दुरुस्ती होवून मिळण्यास वादी हक्कदार आहेत काय ? | ...होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## का र ण मि मां सा

वादप्रश्न क्र. १ व २ बाबत -

५. वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा खरेदीखत बेकायदेशीर ठरवून मिळणेसाठी दाखल केला आहे. गहाणखताची प्रत प्रकरणात दाखल केली आहे. वादग्रस्त खरेदीखतानंतर अल्प अवधित वाद मिळकत प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तावित प्रतिवादी पंजाब नॅशनल बँक, लक्ष्मी रोड, शाखा-पुणे कडे गहाण ठेवुन कर्ज मिळविल्याचे गहाणखतावरून दिसून येते. दावा परीणामकारकरीत्या निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रस्तावित बँकेस प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे उचित ठरते. सदर दुरुस्ती झाल्यास दाव्याचे स्वरूप बदलणार नाही अथवा प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही. सबब वाद प्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत असून वादप्रश्न क्र. २ करीता, निम्न आदेश पारित करण्यात येत आहेत.

## आ दे श

१. नि. ३५ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. नि. ३५ येथील अर्जातील विनंतीनुसार वादीने पुढील तारखेस अगर तत्पुर्वी वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्राची प्रत सादर करावी व त्याची दुरुस्त प्रत प्रतिवादींना पुरवावी.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.03.27 16:35:34 +0530

दिनांक २७/०३/२०२५.
श्रीगोंदा.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.